## वादपत्र निशाणी क्रमांक ०१ वर आदेश
(पारीत केलेला दिनांक **०१.०८.२०२३**)

**०१.** प्रतिवादी क्रमांक ०४ आणि विधीज्ञ गैरहजर.

**०२.** प्रतिवादी क्रमांक ०४ ही दिनांक **१५.०२.२०२३** रोजी वकीलपत्र **नि.क्र.१६** अनुसार विधीज्ञ **श्री. एफ. वाय. पठाण** यांच्यामार्फत हजर झाली आहे. प्रतिवादी क्रमांक ०४ ने मुदतीत **कैफियत** दाखल केली नाही किंवा मुदत अर्ज दाखल केला नाही.

**०३.** प्रतिवादीने **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१ सह वाचनीय क्रम ०५ नियम ०१** नुसार मुदतीत **कैफियत** दाखल केली नाही. म्हणून त्याच्याविरुध्द **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०** नुसार दावा '**विना कैफियत**' चालवण्याचा आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

### आदेश

०१. प्रतिवादी क्रमांक ०४ ने मुदतीत कैफियत दाखल केली नाही म्हणून तिच्याविरुध्द **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १० नुसार** दावा **'विना कैफियत'** चालवण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2023.08.01 17:18:27 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**
**सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,**
**औसा. जिल्हा लातूर.**

**दिनांक :- ०१.०८.२०२३.**
**ठिकाण :- औसा.**